# बोगद्याच्या कामांना सुरुवात




**पुणे :** शहरातील मेट्रोच्या उन्नत मार्गिकेसह (एलिव्हेटेड) भुयारी मार्गातील बोगद्याच्या निर्मितीच्या कामालाही महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) सुरुवात केली आहे. महामेट्रोकडे सध्यातरी मजुरांची संख्या पुरेशी असली, तरी हे सर्व मजूर आगामी काळात कामावर टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. गेल्या आठवड्यात महामेट्रोने पावसाळ्यापूर्वीच्या शहरातील कामांना सुरुवात केली होती. त्यामध्ये प्रामुख्याने नदीपात्रात टाकलेला भराव काढून घेण्याचे काम सुरू करण्यात आले होते.